MHNG080001972024

म.हि.कौ.सं.अर्ज. क्र. ०३/२०२४
फायजा सदफ वि. मो. साहिल

(निशाणी क्र.५ वर आदेश पारीत)
(दिनांक १२.१२.२०२४)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने कलम २३ कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अंतर्गत दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदाराने कलम २३ नुसार गैरअर्जदार विरुध्द दरमहा रु. १५,०००/– (रुपये पंधरा हजार फक्त) अशी अंतरीम पोटगी मिळण्याची विनंती केली आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याची पत्नी असून त्यांचे लग्न दिनांक २७.११.२०२२ मुस्लीम रितीरिवाजाने झाले. अर्जामध्ये अर्जदाराने तिला होत असलेल्या घरघुती हिंसाचाराबाबतच्या तक्रारी सविस्तरपणे नमुद केल्या आहेत. अर्जदार ने कथन केले आहे की गैरअर्जदार हे अर्जदार हिला शिवीगाळ करीत होते. गैरअर्जदार हे नेहमी अर्जदार हिने माहेरून चार चाकी वाहन आणले नाही म्हणून तिचा छळ करीत होते. अर्जदारने लग्नात चार चाकी वाहन दिले नाही तर लग्न मोडण्याची धमकी देत होते म्हणून अर्जदाराच्या आईवडीलांनी त्यांना विनंती केली व पाच लाख दहेज देण्याचे ठरले. अर्जदाराच्या आईवडीलांनी लग्नात भेटवस्तु व सोने–चांदीचे दागिने दिले. गैरअर्जदार हे लग्नाच्या दिवशी घरी आले व २५ जोडे सुटची मागणी करू लागले. तसेच २५ जोडे सुट दिले नाही तर लग्न होणार नाही अशी धमकी देत होते. गैरअर्जदाराच्या प्रत्येक नातेवाईकांची लग्नात जेवणखावण्याची व मानसन्मानाची योग्य ती काळजी घेण्यात आली होती, तरी सुध्दा गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या वडिलांच्या घरी लग्नात झगडा–भांडण केले,

जेवण व बाटल्या फेकुन दिल्या. तसेच, 'भिखारी, पैसे नही है तो लडकी की शादी क्यो की, गाडी लेकर नही दिया तो अपने लडकी को वापस लेकर जाना', अश्या अपशब्दात गैरअर्जदार हे अर्जदाराच्या वडिलांना लग्नाच्या मंडपात अर्जदाराच्या सर्व नातेवाईंकासमोर बोलले. त्यानंतर अर्जदाराच्या नातेवाईकांनी गैरअर्जदारांना समजावून त्यांना भेटवस्तु दिल्या व त्यानंतर गैरअर्जदार अर्जदार हिला घेवून गेले. अर्जदाराच्या वडीलांनी गैरअर्जदाराला चार चाकी वाहन दिले नाही म्हणून अर्जदार हिचा छळ करीत होते व घरातील सर्व कामे अर्जदार हिच्याकडून करून घेत होते.

३. अर्जदारने पुढे असे कथन केले की डिसेंबर २०२२ मध्ये अर्जदार ही गर्भवती होती. तेव्हा गैरअर्जदारांनी अर्जदार हिला गर्भपात करण्यास सांगितले. अर्जदार हिचा गर्भपात करण्यासाठी गैरअर्जदार हे अर्जदार हिला जेवणातून व दुधातून गर्भपाताच्या गोळ्या दिल्या होत्या. त्यामुळे तिची प्रकृती बिघडली होती. डॉक्टरांनी तिला आराम करण्याकरीता सांगितले तरी सुध्दा गैरअर्जदार हे तिचा छळ करीत होते व तिला मारहाण करीत होते. गैरअर्जदाराने अर्जदार हिला मारहाण केल्यामुळे ती जखमी झाली होती. अर्जदाराच्या आईवडीलांनी पोलीसात तक्रार करू नये म्हणून गैरअर्जदार हा जबलपूर येथे पळून गेला होता व १० ते १५ दिवसानंतर परत आला. त्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदाराकडे चार चाकी वाहनाची मागणी केली. जर वाहन दिले नाही तर जबलपूर येथे दुसरे लग्न करणार अशी धमकी दिली.

४. अर्जदाराने पुढे असे कथन केले की दिनांक २८.१२.२०२३ रोजी अर्जदाराच्या वडिलांच्या घरी आले. तेव्हा गैरअर्जदार पुन्हा अर्जदाराच्या वडीलांकडे पाच लाखाची मागणी केली. अर्जदाराच्या वडीलांनी पैसे देण्यास नकार दिला असता गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार हिचा गळा दाबून तिला जिवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच मुख्य अर्जात नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार यांनी अर्जदार यांच्यावर कौटुंबिक हिंसाचाराच्या अनेक घटना नमुद केल्या आहेत.

५. अर्जदाराने पुढे असे कथन केले की गैरअर्जदार क्र.१ हा फळे व भाजीपाला विकण्याचा व्यवसाय करून एका दिवसाला १,५००/– ते २,०००/– रुपये कमवितो व त्याला दरमहा ५०,०००/– ते ६०,०००/– रुपये मिळते. त्यामुळे अंतरिम पोटगीच्या अनुषंगाने अर्जदाराचे असे कथन आहे की, मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत तिला गैरअर्जदार कडून दरमहा रक्कम रुपये १५,०००/– इतकी अंतरिम पोटगीचा आदेश व्हावा.

६. गैरअर्जदार यांनी नि.क्र.१४ खाली त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे व अर्जातील सर्व कथने नाकारली आहे. अर्जदार सोबतचे नाते गैरअर्जदार यांनी कबुल केले आहे. गैरअर्जदार याने असे कथन केले आहे की अर्जदार ही गैरअर्जदारासोबत भाड्याच्या घरामध्ये राहत होती. अर्जदार ही विवाहानंतर काही दिवस चांगली राहिली व त्यानंतर लहान लहान कारणावरून भांडण करीत होती. अर्जदार ही खूप हायपर होती व ती लहान लहान गोष्टीवर जीव देण्याचा प्रयत्न करीत होती व रागामध्ये स्वतःचेच डोके भिंतीवर आपटत होती व स्वतःलाच इजा करत होती व ते सर्व गैरअर्जदाराने केले असे म्हणत होती.

७. गैरअर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की अर्जदार ही लहानसहान कारणावरून तिच्या आईवडीलांना घरी बोलवीत होती व तिचे आईवडील तिला समजावून घरी घेवून जात होते. अर्जदार ही गरोदर असताना गैरअर्जदार तिची सर्व काळजी घेत होते. अर्जदाराच्या सांगण्यावरून गैरअर्जदाराने एका वर्षामध्ये तीन भाड्यांची घरे बदलली. अर्जदार ही व्यवस्थीत राहत नव्हती व गैरअर्जदार यांच्यासोबत भांडण करीत होती. अर्जदार ही गैरअर्जदार व त्याचा नातेवाईकांना खोट्या केसमध्ये फसविण्याची धमकी देत होती व गैरअर्जदारावर संशय घेत होती. अर्जदार, तिचे आईवडील व भाऊ गैरअर्जदाराला नेहमी धमकावीत होते. अर्जदार ही भांडण करून स्वतःहून माहेरी गेली आहे. गैरअर्जदाराने मुस्लीम रितीरिवाजाने अर्जदार हिला घटनस्फोट दिलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती गैरअर्जदार यांनी केलेली आहे.

८. अर्जातील कथनांवरून पुढील वाद मुद्दे माझ्या विचारार्थ असून त्याखालील दिलेल्या कारणांकरीता निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदारावर गैरअर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते काय ? | होकारार्थी |
| २ | अर्जदार ही अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| ३. | आदेश काय ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ ते ३ करीता–**

९. मुळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदाराने गैरअर्जदाराविरुध्द कौटुंबिक हिंसाचार केल्याचे कथन केले आहे. अर्जदारच्या कथनानुसार गैरअर्जदार अर्जदारास हुंड्याकरीता, चार चाकी वाहनाकरीता त्रास देत होते. गैरअर्जदार हे अर्जदारास नेहमी टोमणे मारून शिवीगाळ करीत होते. अश्या प्रकारे गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला शारिरीक, मानसीक व आर्थिक त्रास दिलेला आहे.

१०. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरून व गैरअर्जदार यांनी मान्य केल्या प्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ हे पती पत्नी आहेत. कोणतीही विवाहीत स्त्री विनाकारण पतीचा त्याग करून माहेरी राहण्यास जाणार नाही. अर्जदाराच्या अर्जामधील कथने व शपथपत्रावरून प्रथमदशर्नी अर्जदाराच्या बाबतीत गैरअर्जदार यांचे कडून कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य घडल्याचे दिसून येते. तसेच अर्जदार ही सध्या गैरअर्जदार सोबत राहत नसल्याचे दिसून येते. तसेच गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला तलाकनाम्याची नोटीस पाठवून तलाक दिल्याचे कथन केले आहे. अर्जदार क्र.२ हा अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचा मुलगा आहे.

अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील नाते लक्षात घेता अर्जदार यांच्या पालनपोषणाची नैतीक व कायदेशीर जबाबदारी ही गैरअर्जदार क्र.१ यांची आहे. त्यामुळे अर्जदार यांच्या उदरनिर्वाहाची सोय करण्याची जबाबदारी ही गैरअर्जदार क्र.१ यांची आहे. सबब अर्जदार गैरअर्जदार क्र.१ कडून अंतरिम आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र आहे.

**११.** अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ कडून रक्कम रुपये १५,०००/- अंतरिम पोटगी म्हणून मागणी केली आहे. अर्जदाराच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र.१ याचा फळांचा व भाजीपाल्याचा व्यवसाय असून त्याला दरमहा ५०,०००/- ते ६०,०००/- रुपये उत्पन्न मिळते. परंतु त्याबाबत कोणतेही कागदपत्र अर्जदारने याकामी दाखल केलेले नाही. अश्या परिस्थितीत सद्यः स्थितीच्या महागाईच्या दराचा विचार करता अर्जदार यांना गैरअर्जदार क्र.१ कडून रुपये ३,०००/- प्रति महिना पोटगी मंजुर करणे योग्य होईल. करीता मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी देवून मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशःत मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार यांना रक्कम रुपये ३,०००/-दरमहा मुळ अर्ज दाखल तारखेपासून ते मूळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत अतंरीम पोटगी द्यावी.

३. या निर्णयाची प्रत दोन्ही पक्षकारांना विनामुल्य पुरविण्यात यावी.

SAGAR SHAM JADHAV

Digitally signed by SAGAR SHAM JADHAV
Date: 2024.12.12 17:20:30 +0530

**ठिकाण –कामठी** **(सागर एस. जाधव)**

**दिनांक –१२/१२/२०२४** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. २, कामठी.**